Exh-1/B

# मा. दिवाणी न्यायाधीश साहेब, क. स्तर, अंबाजोगाई
# जि.बीड यांचे न्यायालयात

नियमित दिवाणी दावा क्र. ....../2026

वादी : **मंजुळा भ्र. दिलीप मुरकुटे** वयः 42 वर्षे, धंदा : घरकाम
रा. सोमनवाडी ता. अंबाजोगाई जि.बीड

**विरूध्द**

प्रतिवादी :

1. **रूक्षराज पिता लक्ष्मण चाटे** वयः 50 वर्षे धंदाः शेती
रा. सोमनवाडी ता. अंबाजोगाई जि.बीड

2. **खुशाल पिता लक्ष्मण चाटे** वयः 48 वर्षे धंदाः शेती
रा. सोमनवाडी ता. अंबाजोगाई जि.बीड

3. **चांगुणा भ्र. विश्वांभर आंबेकर** वयः 52 वर्षे
धंदा : घरकाम रा. नरवटवाडी ता. रेणापूर जि. लातूर

4. **शालूबाई भ्र. बब्रूवान कांदे** वयः 54 वर्षे धंदा : घरकाम
रा. जिरेवाडी ता. परळी वै. जि.बीड

**दावा :** वाटणी करून स्वतंत्र ताबा मिळणे बाबत

**वादीतर्फे प्रतिवादीच्या विरूध्द खालील प्रमाणे दावा सविनय सादर**

1. हे की, वादी व प्रतिवादी नं 1 ते 4 हे आपसात सख्खी भावंडे असून वादी व प्रतिवादी नं 1 व 2 हे मौजे सोमनवाडी ता. अंबाजोगाई जि.बीड येथील रहिवाशी आहेत. प्रतिवादी नं 3 ही मौजे नरवटवाडी ता. रेणापूर जि. लातूर येथील रहिवाशी असून प्रतिवादी नं 4 ही मौजे जिरेवाडी ता. अंबाजोगाई

जि.बीड येथील रहिवाशी आहे. वादी व प्रतिवादी नं 1 ते 4 यांचे जन्मदाते वडील नामे लक्ष्मण पिता रंगनाथ चाटे हे सन 2020 साली मयत झालेले असून आई नामे समाबाई भ्र. लक्ष्मण चाटे या सन 2018 साली मयत झालेल आहेत.

2. हे की, वादी व प्रतिवादी यांचे मध्ये त्यांचे वडीलोपार्जीत जमीन जायदादींबाबत अद्याप पावेतो सरस निरस मानाने वाटण्या झालेल्या नाहीत. परंतू वादी व प्रतिवादी यांच्या हिंदू एकत्र कुटुंबाच्या जमीन जायदादी या मौजे सोमनवाडी ता. अंबाजोगाई जि.बीड शिवारामध्ये असून त्या कुटुंब प्रमुख म्हणून मयत वडीलांचे नावे होत्या त्यापैकी काही मिळकती या मयत वडीलांनी कौटुंबीक व्यवस्था व शासकीय योजनांचा लाभ घेणेकामी औपचारीक रित्या प्रतिवादी नं 1 व 2 यांचे नावे केलेल्या असल्याने सद्यस्थितीत त्या प्रतिवादी नं 1 व 2 आणि मयत वडील लक्ष्मण पिता रंगनाथ चाटे यांचे नावे महसूल अभिलेखात नोंद आहेत. त्यांचा पतशील खालील प्रमाणे

मपुळ

| अ.क्र. | गट / सर्वे नं. | क्षेत्र हे.आर | आकार रू.पै. | पो.ख. हे.आर | नावे |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 86 | 00.33 | 00.79 | 00.00 | मयत लक्ष्मण |
| 2. | 26 | 00.20.50 | 00.48 | 00.04 | प्र.वा. 1 |
| 3. | 342 | 00.03.50 | 00.13 | 00.00 | प्र.वा. 1 |
| 4. | 88 | 00.20 | 00.47 | 00.06 | प्र.वा. 1 |
| 5. | 90 | 00.45 | 00.76 | 00.05 | प्र.वा. 1 |
| 6. | 26 | 00.20.50 | 00.48 | 00.03 | प्र.वा. 2 |
| 7. | 342 | 00.03.50 | 00.13 | 00.00 | प्र.वा. 2 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 8. | 88 | 00.20 | 00.47 | 00.04 | प्र.वा. 2 |
| 9. | 90 | 00.46 | 00.78 | 00.03 | प्र.वा. 2 |
| | एकुण | 02.12 | 04.49 | 00.22 | |

येणे प्रमाणे 02 हे 12 आर व पोटखराब 00 हे 22 आर अशी एकुण 02 हे 34 आर शेत जमीन ही वादी व प्रतिवादी यांचे हिंदू एकत्र कुटुंबाची अविभाज्य मिळकत असून सदर मिळकतीस प्रस्तूत दाव्यात **वादग्रस्त मिळकत** म्हणून संबोधण्यात येत आहे. तसेच वादी व प्रतिवादी यांच्या हिंदू एकत्र कुटुंबाची राहती घर जागा मौजे सोमनवाडी ता. अंबाजोगाई जि.बीड ग्रामपंचायत हद्दीमध्ये ग्रामपंचायत घर क्र. 203 ही मयत वडील लक्ष्मण रंगनाथ चाटे यांचे नावे आहे. परंतू सदर घर मिळकतीमध्ये वादीस वाटणी घेवून त्याचा उपभोग घेणे गैरसोईचे असल्याने वादीने सदर मिळकत दाव्यात वादग्रस्त म्हणून समाविष्ट केलेले नाही.

मधुळ

3. हे की, परंतू सद्यस्थितीत वादी व प्रतिवादी नं 3 व 4 यांना वादग्रस्त मिळकतीमधून कायमचे बेदखल करण्याच्या व वादीचा वादग्रस्त मिळकतीमधील कायदेशीर हिस्सा गिळंकृत करण्याच्या दुषीत उद्देशाने प्रतिवादी नं 1 व 2 हे मयत वडीलांचे नावे असलेल्या मिळकती बाबत वादीच्या परस्पर त्यांचे एकट्याचे नावे वारसाचा फेरफार महसूल अभिलेखात नोंदवण्याच्या प्रयत्नात असल्याची खात्रीशीर माहिती वादीस प्राप्त झाल्यामुळे वादीने दिनांक 25.12.2025 रोजी नातेवाईक व गावातील प्रतिष्ठीत व्यक्तींसह प्रतिवादी नं 1 व 2 यांची समक्ष भेट घेवून विचारणा केली असता प्रतिवादी नं 1 व 2 यांनी तुला काय करायचे ते करून घे असे म्हणून वादीस अपमानास्पद वागणूक दिली म्हणून वादीने प्रतिवादी नं 1 व 2 कडे वादग्रस्त मिळकतीची सरस निरस मानाने वाटणी करून वादीचा वादग्रस्त मिळकतीमध्ये असलेला जन्मजात कायदेशीर हिस्सा त्यांचे स्वतंत्र ताब्यात देण्याची विनंती केली असता प्रतिवादी नं 1 व 2 यांनी त्यास स्पष्ट

इन्कार केला व तुला जमीनीतील एक मातीचा खडा देखील मिळू देणार नाही अशी धमकी दिली.

म्हणून वादीस तिचे वादग्रस्त मिळकतीमधील कायदेशीर हक्क व हिस्सेचे संरक्षणार्थ प्रस्तूत दावा मा. न्यायालयात दाखल करण्यास दिनांक 25.12.2025 रोजी कारण घडले असून त्याचा जाब देण्याची जबाबदारी प्रतिवादी नं 1 व 2 यांचेवर आहे. प्रतिवादी नं 3 व 4 यांना केवळ आवश्यक पक्षकार म्हणून समाविष्ट केलेले आहे.

4. हे की, वादग्रस्त मिळकतीमध्ये वादीचा जन्मजात कायदेशीर 1/5 हिस्सा असून तो वादग्रस्त मिळकतीची सरस निरस मानाने वाटणी करून तो वादीचे स्वतंत्र ताब्यात देण्यात येणे न्यायाचे व योग्य आहे.

मधुळ

5. हे की, प्रस्तूत दाव्यातील वादी व प्रतिवादी नं 1 व 2 यांचे कायम स्वरूपी रहिवासाचे ठिकाण तसेच वादग्रस्त मिळकतीचे ठिकाण मौजे सोमनवाडी ता. अंबाजोगाई जि.बीड हे मा. कोर्टाचे स्थळसीमेच्या आतील असल्याने प्रस्तूतचा दावा मा. कोर्टात दाखल करण्यात येत आहे जो मा. कोर्टास दाखल करून घेवून न्याय निर्णीत करण्याचा अधिकार आहे.

6. हे की, वादीचा दावा हा वाटणी करून स्वतंत्र ताबा मिळणे बाबतचा असून वादी दाव्याचे मुल्य मा. कोर्टाचे आर्थिक अधिकार मर्यादेकरीता वादग्रस्त मिळकतीचा एकुण शेतसारा रू. 04.49 पै. मधील वादीच्या हिस्सेचा शेतसारा रू. 00 रू. 90 पै. च्या 200 पट रू. 180/- इतके करत असून कोर्ट फीस करीता दाव्याचे मुल्य वादग्रस्त मिळकतीच्या शेतसाऱ्याच्या 40 पट म्हणजेच रू. 36 एवढे करत आहे. त्यावर ठरावीक कोर्ट फीस रू. 200/- देत आहे जी योग्य व पुरेशी आहे.

सोबत वादीचे शपथपत्र दाखल आहे.

## तरी विनंती की,

वादीचा दावा प्रतिवादीच्या विरूध्द खालील प्रमाणे खर्चासह डिक्री करण्यात यावा.

अ. प्रस्तूत दाव्याचे कलम नं 2 मधील वादग्रस्त मिळकतीची सरस निरस मानाने वाटणी करून वादीचा त्यामध्ये असलेला कायदेशीर 1/5 हिस्सा वादीच्या स्वतंत्र ताब्यात देण्यात यावा.

ब. प्रस्तूत दाव्याचा खर्च प्रतिवादीकडून वसूल करून वादीस देण्याबाबत आदेश पारीत करण्यात यावा.

क. वादी अन्य ज्या मागणीची कायद्यान्वये हक्कदार ठरेल ती मागणी वादीच्या हक्कात देण्यात यावी.

दिनांक : 05-01-2026 वादी

**मंजुळा भ्र. दिलीप मुरकुटे**

रा. सोमनवाडी ता. अंबाजोगाई जि.बीड

प्रतिज्ञेवर सत्य निवेदन करते की, वरील दाव्यातील संपूर्ण मजकूर माझ्या उत्तम माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर असून त्यावर मी वाचून समजून उमजून तसदिका केल्या असे फक्त.

दिनांक : 05-01-2026 वादी

**मंजुळा भ्र. दिलीप मुरकुटे** रा. सदर

मार्फतः

**ॲड. ए.पी.मुंढे**, अंबाजोगाई